-९५-

प्राचिन स्मारके, पुरातत्व स्थळे व अवशेष
अधिनियम १९५८
अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत....

-15-

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रकः संकीर्ण-२००४/प्र.क्र.३१६/सांका-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः 20 नोव्हेंबर, 2004.

**शासन परिपत्रकः-** प्राचिन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे व अपशेष अधिनियम १९५८ च्या अंतर्गत केलेल्या नियमानुसार संरक्षित स्मारकापासूनचे १०० मिटर क्षेत्र सुरक्षित क्षेत्र म्हणून आणि ३०० मिटर चे क्षेत्र हे विनियमित क्षेत्र म्हणून घोषित असते. या क्षेत्रामध्ये उपरोक्त कायद्यानुसार कोणतेही तात्पुरते किंवा कायमचे, लहान किंवा मोठे बांधकाम अनुज्ञेय नाही.

२. भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या स्थानिक अधिका-यांनी वारंवार संबंधितांच्या निदर्शनास आणून देखील या कायद्याच्या तरतूदींचे योग्य प्रकारे पालन केले जात नाही. संरक्षित स्मारका लगतच्या क्षेत्रात भिंतीपत्रे, जाहिराती , दुकाने, फलक , इत्यादि उभारण्यात येतात. ही बांधकामे ब-याचदा उंच असतात. त्यांच्यामुळे संरक्षित स्मारके विद्रुप झालेली आहेत. याचा ऐतिहासिक स्मारकांच्या सभोवतालचा परिसर व पर्यावरणावर परिणाम झाला असून त्यामुळे स्मारकास भेट देणा-या पर्यटकांचे भारताच्या सांस्कृतिक जीवनाबद्दल प्रतिकूल मत होऊ शकते.

३. या सर्वांचा विचार करुन तसेच संरक्षित स्मारकांची योग्य प्रकारे जतन व दुरुस्ती होण्यासाठी आणि पर्यटनास प्रोत्साहन देण्याकरिता सर्व जिल्हाधिकारी आणि जिल्हा पातळीवरील इतर अधिका-यांना कळविण्यात येते की, प्राचिन स्मारके , पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम १९५८ चा कायदा आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमांचे सक्तीने पालन / अंमलबजावणी करण्यासाठी दक्षता घ्यावी. कायद्याचे पालन करण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

संजीवनी कुट्टी

( संजीवनी कुट्टी )
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व आयुक्त, महानगरपालिका,
सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मंत्रालयीन विभाग,
संचालक / सर्व सहाय्यक संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये,
सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती, का. सांका-३.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - RB
आवक नं. -
9 DEC 2004
कार्यविवरण नं. -

सर्व तहसीलदार/SDO यांना कळविणे NA परवानगी देताना वरील वंदणे पाळणेचे आहे

***********

एच-756(1000-11-04).

15 DEC 2004

जिल्हा दंडाधिकारी रत्नागिरी कार्या